**चैत्र - चाहूल**

चंद्र सांडला नभात
सडा माझ्या अंगणात
परी अंगी लाही लाही
सारी रात जळे वात ||

काळी आवस सरली
सूर्य दिशा पालवली
लाल हिरवी कोवळी
फांदी फांदी शहारली ||

धम्म केशरी जांभळे
जणू पंचमी उधळे
हळू हेलक्याने झुले
साऱ्या रंगांचे झोपाळे ||

आला फुटवा फिरोनी
पानी आंबा मोहरावा
रानी कोकिळेची शीळ
अन साक्षीला बहावा ||

रानी पेटला विखार
फुले फेकती अंगार,
ऐन वैराग्य क्षणांचे
तेच नवे अलंकार ||

साऱ्या सृष्टीचे हे रूप
कसे कोण अनामिक
भासे परी जाणीवेत
स्वर्ग उतरे क्षणिक ||

मन जरासं व्याकूळ
माती भेगाळे पाऊल
ओल डोळ्यांची सुकेना
येई चैत्राची चाहूल ||

**---संध्या रानडे**